# वर्गापासून तालुक्याच्या विकासाकडे

खंडाळा तालुका हा सातारा जिल्ह्यातला सर्वात लहान तालुका आहे. त्यातील लोणी केंद्र शैक्षणिक दृष्टीने पुढारलेले आहे. खंडाळा तालुक्यात शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी अनेक उपक्रम घेतले जातात. त्यामध्ये लोणी केंद्रातील शिक्षक सक्रिय सहभाग घेत असतात. भोळी येथील जिल्हा परिषद शाळेतले संतोष नेवासे हे शिक्षक अशाच उत्साही शिक्षकांपैकी आहेत. ते २०१८ सालापासून या शाळेत काम करत असून मुख्यतः इयत्ता तिसरीच्या वर्गाला शिकवतात.

गेल्या वर्षभरात खंडाळा तालुक्यामध्ये मूलनिहाय नियोजन या संकल्पनेची ओळख आणि प्रशिक्षण द्यायला सुरुवात झाली. त्यासाठी ग्यानप्रकाश फाउंडेशन व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था फलटण यांनी जिल्हा आणि तालुका स्तरावर मूलनिहाय नियोजनाच्या कार्यशाळा घेतल्या. संतोष नेवासे सर यांना ही संकल्पना किती प्रभावी आहे हे लक्षात आले. प्रत्येक मूल वेगवेगळ्या पद्धतीने शिकते. त्यानुसार त्या मुलाला अध्ययन अनुभव देणे गरजेचे आहे आणि क्षमताधिष्ठित शिक्षणपद्धतीचा हाच मूळ गाभा आहे. नेवासे सरांनी मूलनिहाय नियोजन कसे असते हे समजावून घेतले आणि स्वतःच्या वर्गात ते राबवायला सुरुवात केली.

ते स्वतः मनापासून मुलांमध्ये रमतात. त्यामुळे ते वर्गामध्ये मुलांसोबत काम करताना विविध पद्धतींचा वापर करू लागले. उदा. टपाल खात्याबद्दल मुलांना माहिती देताना प्रत्यक्ष पोस्टमनना बोलावून त्यांच्या मदतीने मुलांना माहिती दिली. विविध उपक्रमांच्या मदतीने त्यांनी मुलांना त्यांच्या क्षमतेनुसार अध्ययन अनुभव देण्यास सुरुवात केली. यातून एका चांगल्या वर्गप्रक्रियेची सुरुवात झाली. शिकवताना प्रत्येक मुलाचा विचार होऊ लागल्याने आपल्याला सामावून घेतले गेल्याची भावना मुलांमध्ये वाढीस लागली. त्यामुळे वर्गामध्ये कमी बोलणारी मुलेदेखील पुढे येऊन बोलू लागली.

स्वतः मूलनिहाय नियोजनानुसार काम करताना वर्गातील किंवा शाळेतील कोणताही उपक्रम अध्ययन निष्पत्तीशी जोडलेला आहे हे नेवासे सरांच्या लक्षात आले. तसेच पाठ्यपुस्तकातील प्रत्येक घटक अध्ययन निष्पत्तीशी कसा जोडता येईल हे ही त्यांनी बघितले. आपल्या वर्गात ही संकल्पना राबवत असताना पुढे जाऊन त्यांनी केंद्र संसाधन गटाच्या बैठकीत आपला अनुभव मांडला. तसेच मूलनिहाय नियोजन राबवत असताना आपल्याला कोणत्या अडचणी आल्या, त्यासाठी आपण काय केले आणि शाळेतील उपक्रम व पाठ्यपुस्तकातील घटक यांची अध्ययन निष्पत्तीशी सांगड कशी घालावी याविषयी त्यांनी या बैठकीत सांगितले. शिक्षण परिषदेत याचे प्रात्यक्षिक दाखवून इतर शिक्षकांना याविषयी मार्गदर्शनदेखील केले. त्यानंतर संपूर्ण लोणी केंद्रात ही प्रक्रिया राबवायला सुरुवात झाली.



पुढे लोणी केंद्रामधील सकारात्मक अनुभवामुळे खंडाळा तालुक्यातील इतर केंद्रांना याविषयी कुतूहल वाटू लागले. मग तालुका गुणवत्ता कक्षात नेवासे सरांनी आपला अनुभव मांडला. मूलनिहाय नियोजन हे आपल्या इतर कामांपेक्षा अधिकचे आणि वेगळे काम आहे अशी समजूत सहसा शिक्षकांमध्ये आढळते. मात्र ते अध्ययन निष्पत्तीशी आणि शिकवण्याच्या प्रत्येक घटकाशी कसे जोडलेले आहे हे नेवासे सरांनी त्यांना समजावले. अशारीतीने आपल्या अनुभवाचा केंद्राला आणि तालुक्याला फायदा व्हावा यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. एक शिक्षक ते तालुका गुणवत्ता कक्षातील सदस्य यामधील प्रत्येक टप्प्यावर त्यांनी आपले योगदान दिले आहे. हे करत असताना त्यांनी वेळोवेळी ग्यानप्रकाश फाउंडेशनच्या प्रतिनिधींसोबत चर्चा करून सर्व शैक्षणिक प्रक्रिया समजून घेतल्या. प्रत्येक मूल शिकावे यासाठी जे काही गरजेचे असेल, मग तो तंत्रज्ञानचा वापर असो किंवा योग्य वर्गप्रक्रिया असो ते जाणून घेऊन राबवण्यावर त्यांनी भर दिला.

एका शाळेतील एखाद्या शिक्षकामध्ये जरी नवीन वर्गप्रक्रिया राबवण्याची इच्छा असेल तरी योग्य शिक्षणप्रक्रियेच्या मदतीने त्याचा व्यापक परिणाम कसा होतो हेच या घटनेवरून दिसून येते.



The Collaborators for Transforming Education
EdelGive Foundation
दिनांक: जुलै २०२३
©: ग्यान प्रकाश फाउंडेशन
2016 पासून एडेलगिव्ह फाऊंडेशनद्वारे अर्थसहाय्यित, महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या कोलॅबोरेटर्स फॉर ट्रान्सफॉर्मिंग एज्युकेशन (CTE) प्रोग्राममध्ये शिकलेल्या गोष्टींवर आधारित आहे.